किंमत : १० रुपये

ऑगस्ट २००८

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

## विश्वास : प्रगत भविष्यासाठी...

- वेध अणुउर्जेचा
- शिक्षण आणि मानव संसाधन विकास
- राजकारण व प्रादेशिक पक्ष
- ऑस्ट्रेलियाचा दुष्काळाशी सामना
- जागतिक महागाई
- महिला बचत गट

## कोकण विकासाचा मंत्र

# सिंचन आणि सॉफ्टवेअर



*तामिळनाडू राज्यातील कोईमतूर कृषि विद्यापीठाने नुकतीच श्री. भवरलाल जैन यांना राज्यपाल सुरजितसिंग बर्नाला यांच्या हस्ते सन्माननीय डी.लिट् ही पदवी बहाल केली.*

**कोईमतूर, दापोली, उदयपूर, जळगाव अशा निरनिराळ्या विद्यापीठांनी नामवंत उद्योगपती आणि जळगावच्या जैन इरिगेशन उद्योगसमुहाचे अध्यक्ष श्री. भवरलाल जैन यांना सन्माननीय डी. लिट् , डॉक्टर ऑफ सायन्स अशा निरनिराळ्या पदव्या देऊन गौरविले आहे. नुकतीच तामिळनाडूतील कोईमतून विद्यापीठाने त्यांना डी. लिट् ही पदवी देऊन त्यांचा सन्मान केला.कोकणात आधुनिक शेतीचे 'मॉडेल' उभे करावे असे त्यांचे बऱ्याच वर्षांपासूनचे स्वप्न आहे. या पार्श्र्वभूमीवर श्री. जैन यांनी राष्ट्रवादी मासिकाला विशेष मुलाखत देताना कोकणासंबंधी व्यक्त केलेले हे मनोगत.**

---

कोकणाची विशिष्ठ भौगोलिक व ऋतुमानाची परिस्थिती, बराचसा भूभाग सपाट, काही डोंगराळ, उंच सखल, चढ-उतारांचा. राहिलेला समुद्र किनारा. जमीन ओलावा धरुन न ठेवण्याच्या क्षमतेची, लहान लहान तुकडेवजा आणि काहीशी आम्ल व क्षारधर्मी, अवघ्या चार महिन्यात धोधो पडणाऱ्या पावसाची बेरीज होते ३०००-४००० मि.मि. उन्हाळ्यात मात्र होतो खडखडाट. हवामान उष्ण व दमट. ५३ टक्के शेतकरी आहेत लहान किंवा अल्पभूधारक.

भात हे कोकणातले मुख्य पिक असून आता काही शेतकरी वर्षातून दोनदा किंवा तीनदा भाताचे पिक घेऊ लागले आहेत. या भाताच्या पिकाने शेतकऱ्यांच्या जीवनात कधीही समृध्दीची पहाट फुलणार नाही. यासाठी भाताशिवाय अन्य अशा बहुहंगामी पिकपध्दतीकडे त्यांना नेले पाहिजे आणि मुख्यत्वे सूक्ष्मसिंचनाच्या आधारे येथे मोठ्या प्रमाणावर आंबा, काजू, कोकम, फणस, नारळ, सुपारी यांच्या बागा उभ्या करुन उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी तिथेच उभारली पाहिजे. स्थानिक माणसांना रोजगार पुरवून या उद्योगात सामील करुन घेतले पाहिजे.

कोकणी माणूस पिढयान-पिढ्या नैसर्गिक आक्रमणांना सामोरा जाता राहिला. अस्थिर, असुरक्षित व संकटमय जीवन तो जगला, काळाच्या ओघात त्याचा मूळ स्वभाव आणि संस्कृती मावळत जाऊन त्याचे स्वरुप चळवळ्या, काहींसा उतावीळ, वितंडवादी, हट्टी, भांडकुदळ असा झाल्याचा तिऱ्हाइतांना भासतो. मी तर त्याला व त्याच्या या स्वभावसंस्कृतीला बेजोड आणि असामान्य मानतो. याच स्वभाव-संस्कृतीचा उपयोग करुन त्यांनी जर मनावर घेतलं तर कोकणाच्या भूमीवर तेच अक्षरश: स्वर्गाला उतरवू शकतात.

या कार्यासाठी विद्यापीठाला आज आहे त्यापेक्षा जास्ती समाजोन्मुख व्हावे लागेल. आपल्या कार्याच्या व कर्तव्याच्या सीमांचे विस्तारीकरण करावे लागेल. विद्यापीठाने जर माहिती, प्रसार व प्रशिक्षण याची जबाबदारी स्वीकारली, एका दुभाषाची व सेतूबांधाची भूमिका अंगिकारली तर शेतकऱ्याला अडत्यांच्या व सावकारांच्या विळख्यातून बाहेर निघता येईल. आमच्यासारख्या व्यावसायिक संस्थांना सामाजिक बांधिलकीपोटी अशी आव्हानात्मक कामं, त्याचं नियोजन व विकास करण्यासाठी योग्य ती उत्पादने, तंत्रज्ञान व ध्येय-धोरणे अवलंबून राबवावी लागतील. मूल्यवर्धनासाठी प्रक्रीया प्रकल्पांचे जाळे कोकणात विणावे लागेल. कराराची शेती-संकल्पना इथे रुजवावी लागेल. कोकणी शेतकरी बांधवांना आणि सर्वसामान्य जनतेला एक विधायक व गतिशील, सृजनशील आणि या सामंजस्याची, सामोपचाराची भूमिका स्वीकारावी लागेल. वादासाठी वाद या वृत्तीला फाटा देऊन कठोर परिश्रम करण्यासाठी कटिबध्द व्हावे लागेल.

विरोधाभास आणि विपर्यास असावा तरी किती? आंब्यासारखा फळांचा राजा म्हणून जगमान्य असलेल्या हापूस आंब्याचे माहेरघर आहे कोकणच. परंतु या 'राजावर' प्रक्रिया




करणारा एक लहानसा कारखाना कोकणात आला तोही दोन वर्षांपूर्वीच, नारळाचं पाणी आता दुधापेक्षाही महाग असूनही कोकणी नारळ मात्र प्रक्रियेअभावी आजही नगानेच विकले जातात. त्यावरच्या शेंड्या अजूनही केरळाकडे जाऊन त्यांचेवर प्रक्रिया होऊन तेथे त्याच्या बनतात निर्यात लायक विटा, गाद्या, दोरखंड. कोकणात मात्र आहेत लहान मोठे घरगुती, आजारी उद्योग. नाही म्हणायला काजूचे कारखाने लहान-मोठ्या प्रमाणावर तग धरुन आहेत. पण त्यातही सुधारणेला भरपूर वाव आहे. कृषि मालावर प्रक्रिया करुन त्याचं मूल्य वाढविल्याशिवाय शेतीला चांगले दिवस येणे नोहे !

डोंगरातील मोठ्या उतारांवर तांत्रिक दृष्ट्या योग्य त्या मोजमापाचे ओटे करुन वनीकरण करणे, कमी उतार असेल तिथे ओटे करुन त्यावर आंबा, काजू, फणस यांची लागवड वाढविणे, नारळ व सुपारी बागांमध्ये नगदी व मसाल्यांची आंतरपिके घेणे, डोंगरी जमिनींना लागवडीलायक करणे आवश्यक आहे. आता आधुनिक प्रगत तंत्रज्ञानामुळे, लांब पल्ल्याचा आपण विचार करतो तो शक्य व फायदेशीर सुध्दा ठरु शकतो. अशा डोंगरी पडीक जमिनी कोंकणात सुमारे ८ लाख हेक्टर आहेत. त्यांना आपण लागवडीखाली आणू शकू. अर्थात हे काम सोपेही नव्हे, स्वस्तही नव्हे.

महाराष्ट्रात पडणाऱ्या एकूण पावसापैकी सुमारे ५० टक्के पाऊस कोंकणात पडतो. २० मोठ्या नद्या व सुमारे ८०

उपनद्या याचं जाळंच जणू निसर्गानं कोकणात विणलं आहे. शासनानी आतापर्यंत केवळ दोनचार मोठे सिंचन प्रकल्प निर्माण केले असून तेही कालव्या आधारित आहेत. वस्तुत: भौगोलिक परिस्थितीचा विचार करता कालव्या आधारित सिंचन कोकणाला फावण्यासारखं नाही. त्याऐवजी या नद्यांवर तांत्रिक दृष्ट्या योग्य तेथे साखळी सिमेंटचे किंवा मातीचे बंधारे टाकून सदर साठविलेल्या पाण्याचा उपयोग थेट पंपाद्वारे उपसा जलसिंचन योजना राबवून ठिबक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करणे सर्व हितावह ठरते. कोकणाची लाखो एकर जमीन ओलीताखाली येऊ शकते. तेथे हवी ती पिके घेण्याला लायक असं हवामान उपलब्ध आहे. नद्यांवर बंधारे टाकत असताना वीज उत्पादनाचे प्रकल्पसुध्दा राबविता येतील. प्रत्येक मोठ्या नदीचा या संदर्भाने अभ्यास करुन एक स्वतंत्र योजना-जलसिंचन व विद्युतनिर्मिती योजना-बनविण्यासाठी आयोगाची स्थापना करणे काळाची गरज आहे. पाणी ही एकच वस्तू अशी आहे जी सर्वच प्राणीमात्रांना जीवन बहाल करु शकते.

कोकण हे एक नैसर्गिक हरितगृह आहे म्हणून फळं, फुलं, भाजीपाला, ऊस, तेलबिया इत्यादी पिकांचे भरघोस उत्पन्न ठिबक सिंचन तंत्रज्ञानाद्वारे करण्यासाठी शासनाने खाजगीकरणाला सुध्दा प्रायोगिक तत्वावर तरी वाव द्यावा म्हणजे सदर संकल्पना मार्गी लागू शकेल. पडणाऱ्या पावसाचे ९० टक्के पाणी मातीसोबत आज वाहून जात आहे. जो देश माती वाया घालवतो तो देश स्वत:च वाया जातो असा शास्त्रज्ञांचा सर्वमान्य दंडक आहे. कोकणाची हजारो टन माती दरवर्षी अव्याहतपणे अरबी समुद्राला बहाल केली जाते. ते थांबविल्याशिवाय कोकणाचा विकास हे एक स्वप्न राहील.



कोकण भागांत रासायनिक उत्पादनांना स्थानिक विरोध असल्याचे सर्वश्रृत आहे. त्याबद्दल मी तरी व्यक्तिश: कोकणी जनतेच्या भावभावनांशी सहमत आहे. पर्यावरण व भौतिक विकास या दोघांचा समन्वय साधता आला नाही तर कालांतरांने आपण स्वत:चा विनाश ओढवून घेत असतो. तसे करावयाचे नसेल तर कोकणाच्या जल व मृद संपदेचे शास्त्रीय दृष्ट्या नियोजन करुन त्याला तंत्रज्ञानाची जोड देऊन शेती आधारित उद्योग व्यवसायच येथे वाढवावेत. त्यामुळे कदाचित कोकणी माणूस भौतिक दृष्ट्या अतिउच्च पदावर पोचणार नाही. त्याला स्वत:ला तसे करावयाचे आहे असे गृहित धरण्यासही काही आधार नाही. भौतिक विकास व पर्यावरणाचे संरक्षण या दोघांची भागिदारी हाच शाश्वत विकासाचा गुरुमंत्र आहे.

अभिजात बुध्दीमत्तेचा वारसा व वसा कोकणाकडे आहे. त्याचा पूरेपूर फायदा सिलीकॉन व्हॅली अमेरिकेत घेत आहे. ते थांबवायचे असेल तर येऊ घातलेल्या सॉफ्टवेअर पार्कपैंकी निदान २-४ पार्कस् तरी कोकणाकडे दिले गेले पाहिजेत. माझ्या कोकणी शेतकरी मित्रांनो चळवळ करायचीच असेल, वादंग घालयचेच असतील, क्रांती घडवायचीच असेल तर फक्त दोन कारणांसाठी सज्ज व्हा! निसर्गाने तुम्हाला बहाल केलेल्या साधनसामुग्रीचा, अक्कल-हुषारीचा उपयोग व विकास करण्यासाठीच आपण भांडणार आहोत. यात वावगे तें काय ?

कोकण विकासाचा मंत्र : सिंचन आणि सॉफ्टवेअर! म्हणा "We will not merely stand & stare."